नि. फौ. ख. क्र.१९२/२०१७ निशाणी ३७

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ७ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – राजेश केशवराव साठवणे

वय – ४६ वर्षे,

व्यवसाय – सहा.पो.नि. नियंत्रण कक्ष, नागपूर

पत्ता – नागपूर, ता. जि. नागपूर.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. ०३.०२.२०१७ रोजी मी पोलीस स्टेशन,उरळ येथे पो.उप.नि. म्हणुन कार्यरत होतो. तेथे कार्यरत असतांना मला ठाणेदार साहेबांनी माहिती दिली की, हातरुन शिवारातील सादीक अहेमद यांचे शेतात ३० ते ४० जनावरे पकडुन ठेवली आहेत. त्यांनी मदतीसाठी पोलीस स्टाफ पाठवा असे सांगितले. त्यानंतर बिट जमादार आणि त्यांचे रायटर यांना रवाना करुन नंतर मी, ठाणेदार साहेब आणि पोलीस स्टाफ असे सरकारी वाहनाने बातमीच्या ठिकाणी गेलो. तेथे गेल्यावर आम्हाला सादीक अहेमद यांच्या शेतात ३० जनावरे आढळुन आली. तेथे काही शेतकऱ्यांची आणि स्वतः सादीक अहेमदचे ६ बैल एकमेकांना दोरीने निदर्यतेने बांधलेली आढळुन आली. इतर शेतकऱ्यांची जनावरे त्यांनी मालकी हक्क दाखवल्याने त्यांना परत देण्यात आली आणि सादीक अहेमदचे ६ बैल त्याने कत्तलीसाठी बांधुन ठेवल्याने त्यांचा ताबा बिट जमादार यांच्याकडे देण्यात आला. सदर घटनेची लेखी फिर्याद मी स्वतः दिली. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३८** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येत आहे. आरोपी सादीक अहेमदला पाहिल्यास ओळखु शकेल. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी गुन्हा नोंद केल्यानंतर माझे बयान नोंदविले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.एन.जामोदे यांचे मार्फत</u>**

२. ज्या शेतात आम्ही गेलो होतो ते शेत कोणाचे आहे त्याची माहिती घेतली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, शेतकऱ्यांनी आम्हाला सदरचे शेत सादीक अहेमदचे आहे असे सांगितले होते. मी सदरचे शेताच्या मालकीबाबत महसुल दस्तावेज पाहिले नाही. आरोपीकडे किती एकर शेती आहे त्याबद्दल मला माहित नाही. मारक्या जनावरांना तोंडाला मोरखे बांधावे लागतात किंवा गोठयात खुटयाला बांधुन ठेवावे लागतात. शेतकरी त्यांची जनावरे शेतात गोठा असल्यास गोठयात बांधतात किंवा मोकळ्या जागेत बांधत असतात. घटनेच्या ठिकाणी बरीच गर्दी जमा झाली होती.

३. शासकीय वाहनाने गेल्यास त्याची नोंद स्टेशन डायरीत करावी लागते. मी उरळ पोलीस स्टेशन येथे कार्यरत असतांना तेथे एक शासकीय वाहन होते. सदरचे वाहन एक बोलेरो चारचाकी गाडी होती. माझे बयान पोलीसांनी अंदाजे घटनेच्या २–३ दिवसांनी नोंदविले होते. हातरुन येथे दर मंगळवारी आठवडी बाजार किंवा गुरांचा बाजार असतो किंवा कसे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आठवडी बाजारात जनावरांना विक्री करीता बांधुन घेवुन जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, काही जनावरे खुंखार असल्यास त्यांच्या तोंडाला मोरखा बांधुन पायाला काठी बांधुन घेवुन जावे लागते.

४. दि. ०३.०२.२०१७ रोजी मी हातरुन शिवारात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे बयान मी सांगितल्याप्रमाणे नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे आरोपीने कोणतीही जनावरे निदर्यतेने बांधुन ठेवली नव्हती, तसेच कत्तलीसाठी बांधुन ठेवली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या गुप्त माहितीच्या आधारावर मी आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.07.25 12:20:10 +0530

बाळापूर.
दि. २४/०७/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.